स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

विद्यापीठाच्या कला शाखेअंतर्गत पीएच.डी.(मराठी) पदवीसाठी

सादर करावयाच्या प्रबंधाचा स्थूल आराखडा

विषय

‘‘गौरी देशपांडे आणि मैत्रैयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास’’

संशोधक

कु.जयश्री सुरेश बाबर

मु.पो.काले

ता.कराड जि.सातारा

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एम.एम.जाधव

विभागप्रमुख, मराठी विभाग

बहिर्जी स्मारक महाविद्यालय,बसमत जि.हिंगोली.

संशोधन केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सन २०१७— १८

प्रस्तावना—

साठोत्तरी मराठी वाङ्मयामध्ये विविध साहित्यप्रवाह उदयास आले. त्यामध्ये ग्रामीण, दलित, स्त्रीवादी अशा प्रवाहांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो.तसेच १९६० नंतर पाश्चात्य जगात काही प्रश्नासंबंधी विचारमंथन सुरू झाले.स्त्रीला मतदानाचा हक्क, वारसा हक्क मिळावा या संघर्षातूनच स्त्रीस्वातंत्र्याची प्रेरणा पुढे आली व साहित्यक्षेत्रात स्त्रीवादी प्रवाहाने आपले मूळ धरले.पाश्चात्य देशातील स्त्रीवादी प्रवाह १९७० नंतर भारतीय वातावरणात खऱ्या अर्थाने प्रकट झाला. विश्वातील अनेक कवी, लेखक यांच्यात जेव्हा आपण शेक्सपिअर, कालिदास, व्यास, यांना महत्त्वाचे स्थान देतो तेव्हा आपण प्रकट किंवा अप्रकट तुलनाच केलेली असते

मराठीमध्ये विभावरी शिरूरकर,गौरी देशपांडे ,सानिया,कमल देसाई इ. तर हिंदीमध्ये मन्नू भंडारी,मैत्रेयी पुष्पा,कृष्णा अग्निहोत्री इ.अनेक लेखिकांनी स्त्रीवादी साहित्यप्रवाहाची वाट चोखाळलेली दिसते.मराठीमधील गौरी देशपांडे व हिंदीतील मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्त्रीवादी साहित्याच्या अनुषंगाने आलेले जीवन, प्रदेश,अनुभवविश्व,स्त्रीयांच्या अगणित समस्या,आधुनिकीकरणात स्त्रीच्या मनाचा होणारा कोंडमारा यांचा तौलनिक अभ्यास अतिशय चांगल्या प्रकारे होऊ शकतो.

अभ्यासाचे महत्त्व—

गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्त्रीवादी साहित्याच्या अनेक खुणा दिसतात. त्याचा तौलनिक साहित्याभ्यासाच्या दृष्टिकोनातून अभ्यास करता येणे शक्य आहे.मराठी व हिंदीमध्ये गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचा स्त्रीवादी दृष्टिकोणातून तौलनिक अभ्यास झाल्याचे निदर्शनाला येत नाही. अर्थातचगौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचा स्त्रीवादी दृष्टिकोणातून तौलनिक अभ्यास करताना तत्कालीन समाजिक परिस्थिती, त्याचा स्त्रीच्या अस्तित्वावर पडलेला प्रभाव, स्त्री—स्वातंत्र्य, स्त्री—शिक्षण समस्या, दोघींच्या कादंबऱ्यांमधील साम्य—भेद, प्रभव—प्रभाव अशा अनेक जागा उपलब्ध आहेत. परिणामी ''गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास'' होणे महत्त्वाचे वाटते.

अभ्यासविषयाचा हेतू —

१. गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचा स्त्रीवादी दृष्टिकोणातूनतौलनिक साहित्याभ्यास करणे.

२. सामाजिक जाण आणि कौटुंबिक नातेसंबंध यातस्त्रीच्या मनाचा चाललेला मानसिक संघर्ष यांचा शाब्दीक पातळीवर वेध घेणे.

३. आधुनिकता आणि जागतिकीकरणाच्या दृष्टीमुळे स्त्रीचे दुभंगलेले, पुसलेले, खचलेले आयुष्य पुन्हा नव्याने उभारी घेऊ लागले याचा गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांच्या आधारे शोध घेणे.

४. विवाहसंस्था, परंपरा, जाचक बंधने, पुरूषांची गुलामगिरी इ. विरूद्ध गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबरीतील स्त्रीया कोणती पावले उचलतात याचा साम्य—भेदाच्या पातळीवर शोध घेणे.

५. गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रियांच्या अनेक समस्यांचा तौलनिक दृष्टिकोणातून अभ्यास करणे.

संशोधन पध्द्ती —

गौरी देशपांडे आणि मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास या संशोधनविषयासाठी तौलनिक साहित्याभ्यास, सैद्धांतिक संशोधन पध्द्ती, अन्वयार्थक संशोधन पद्धती, संदर्भान्वयी संशोधन पद्धती, चरित्रात्मक संशोधन पद्धती अशा विविध संशोधन पद्धतींचा अवलंब केला जाणार आहे.

आंतरविद्याशाखीय संबंध —

तौलनिक साहित्याभ्यास या पद्धतीचा साहित्य,कला,नीति,तत्वज्ञान,समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, लोकसाहित्य, अर्थशास्त्र, भूगोल, पर्यावरण इ. विविध विषयांशी आंतरविद्याशाखीय संबंध येतो.

गृहितके —

१. गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये साम्य—भेद, प्रभव—प्रभाव आढळतात.

२. गौरी देशपांडे व मैत्रेयीपुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्त्रीवादी दृष्टिकोण आहे.

३. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत ‘स्त्री’ चे होणारे शोषण व त्याविरूद्ध स्त्रियांनी केलेला विद्रोह याचे चित्रण गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये येते.

४. जागतिकीकरणाच्या युगात स्त्रीचा विविध टप्प्यांवरील संघर्षमय प्रवास याचा प्रत्यय गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये येतो.

प्रकरणांची क्रमशः मांडणी

प्रकरण पहिले

तौलनिक साहित्याभ्यास : स्वरूप,तत्वे आणि दिशा

भारत हा बहुभाषिक देश अनेक परंपरा, आचार—विचार, आहार, वेशभूषा इ. नी नटलेला आहे. वाङ्मय जेव्हा भाषारूप धारण करते तेव्हा त्यात वरील सर्व घटकांचा प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष प्रभाव पडलेला असतो. या सर्व घटकांचा विचार करता तौलनिक साहित्याच्या वाढीसाठी भारताएवढा सांस्कृतिक प्रदेश इतरत्र सापडणे अवघड आहे.तुलनात्मक संशोधनाचे क्षेत्र अत्यंत व्यापक आहे. तौलनिक साहित्याभ्यासात समीक्षा, इतिहास, तत्वज्ञान, कला, संगीत, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकसाहित्य या सर्वांना कवेत घेण्याचे सामर्थ्य आहे. तुलना करणे म्हणजे 'साधर्म्य', 'वैधर्म्य, 'उद्‌गम' आणि 'प्रभाव' या चार अंगांनी घेतलेला शोध होय. ''तुलनेच्या आधाराने केलेला साहित्यांचा अभ्यास तो तौलनिक साहित्याभ्यास होय. अशाप्रकारची व्याख्या वसंत बापट यांनी केली आहे.''दोन भाषा, दोन लेखक, दोन साहित्यप्रकार, दोन कालखंड, दोन परिवेश इत्यादींना अध्ययनसामग्री बनवून परस्पर प्रभावाचे अथवा एकाचा दुसऱ्यावर झालेल्या प्रभावांचे मूल्यांकन करणे म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय." असे आपले मत सुधाकर कालवडे यांनी व्यक्त केले आहे.

'विश्वसाहित्य' व 'राष्ट्रीय साहित्य' संज्ञा स्पष्टीकरण

विश्वसाहित्य म्हणजे विश्वातील संपूर्णसाहित्य असा अर्थ नाही तर विश्वमान्य साहित्य म्हणजे जगातील अशा कृती ज्या स्थलकालांच्या सीमा ओलांडून सर्वत्र आस्वाद्य ठरलेल्या आहेत. राष्ट्रीय साहित्य म्हणजे विशिष्ट देशाचे, संस्कृतीचे साहित्य होय.विश्वसाहित्य हे राष्ट्र व भाषा यांच्या मर्यादा ओलांडणारे असते. राष्ट्रीय साहित्य एकाच देशातील भाषा, एकाच भाषेतील साहित्य असे मर्यादित असते.

प्रभव, प्रभाव, साधर्म्य, वैधर्म्य —

कथा, कादंबरीकार, नाटककार इ. लेखकांच्या साहित्यात आपल्याला प्रभव —प्रभाव,साधर्म्य—वैधर्म्य आढळते ते आपल्याला तौलनिक साहित्याभ्यासाने शोधता येते. प्रत्येक कलाकृतीवर काळाचा, सामाजिक—राजकीय—आर्थिक परिस्थितीचा ठसा उमटलेला दिसतो. याचा आपल्याला ''गौरी देशपांडे व मैत्रेय पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास'' करताना प्रत्यय येईल.प्रत्येक साहित्यकृती अनन्यसाधारण असते असे म्हंटले तर साहित्याच्या क्षेत्रात तुलना होऊ शकत नाही. परंतु दोन साहित्यकृती, दोन लेखक यांच्यात काय साम्य आहे? काही समान प्रभाव आहेत का? हे तपासले जाते तेव्हा साहित्याच्या व्यवहारात तुलना सहजपणे व अपरिहार्यपणे घडत असते.

प्रकरण दुसरे

मराठी व हिंदी स्त्रीवादी साहित्याचा स्थूल आढावा

स्त्रीवादी साहित्य समीक्षा ही साहित्यातील स्त्रीवादी जाणिवांचा शोध घेते, स्त्रीविषयक सौंदर्याच्या रूढकल्पनांना नकार देते. स्त्रीची जाणीव जागृती, माणुसपणाचे हक्क व अधिकार, शारीरिक, मानसिक—बौद्धिक स्वातंत्र्य, स्त्रीचा सर्व अंगांनी विकास अशा अनेक घटकांचा विचार स्त्रीवादी साहित्य समीक्षेत होतो.

स्त्रीवादी साहित्य स्वरूप व व्याप्ती

स्त्री ही केवळ स्त्री आहे म्हणून ती स्त्रीवादी किंवा स्त्रियांनी लिहिलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य असे होत नाही.बाईपणाची कात टाकून माणूसपणाचे नवे रूप धारण करण्याची क्षमता म्हणजे स्त्रीवाद होय. पुरूषी मूल्यदृष्टीतून स्त्रीची प्रतिमा कशी रेखाटली आहे याचा ही अभ्यास स्त्रीवादी समीक्षा करते.स्त्री—पुरूष भेद नाकारून स्त्रीकडे व्यक्ती म्हणून पाहते. स्त्रीवादी साहित्यामध्ये जहाल स्त्रीवाद, मवाळ स्त्रीवाद, पर्यावरणवादी स्त्रीवाद, कृष्णवर्णीय स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद,ब्राम्हण स्त्रीवाद, दलित स्त्रीवाद,मुस्लिम स्त्रीवाद, शहरी स्त्रीवाद, ग्रामीण स्त्रीवाद असे विविध प्रवाह येऊन मिळतात.

भारतीय स्त्रीवादी चळवळ —

१९७५ नंतर भारतात स्त्रीवादी विचारांना सुरूवात झाली असली तरी त्याच्या आधी प्राचीन—मध्ययुगीन काळात स्त्री—स्वातंत्र्याचा विचार येऊन गेला आहे. आर्यांच्या आगमनापूर्वी भारतात मातृसत्ताक कुटूंबपद्धती होती. आर्यांच्या आगनमनानंतर पितृसत्ताक कुटूंबपद्धती आली व स्त्रियांचे स्थान पूर्वीपेक्षा खालावले. महानुभाव व वारकरी संप्रदायाने स्त्री—पुरूष समानतेचा, स्त्री—स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. संत ज्ञानेश्वरांनी स्त्रीला मातेची उपमा देऊन तिचा गौरव केला आहे.चांगदेवासारखा हटयोगी मुक्ताबाईंचे शिष्यत्व पत्करतो. एका पुरूषाने स्त्रीचे शिष्यत्व पत्करणे ही घटना स्त्रीवादी साहित्याला बळकटी देणारी आहे.ब्रिटीश राजवटीत राजा राममोहन रॉय यांनी सती बंदीसाठी प्रयत्न केले. इंग्रजांनी सतीबंदी कायदा केला, विधवा पुनर्विवाहास मान्यता मिळावी म्हणून प्रयत्न केले. म. फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, आगरकर, म. गांधी अशा समाजसुधारकांनी स्त्री जीवन सुधारणेचे कार्य केले.

पाश्चात्य स्त्रीवादी चळवळ —

पाश्चात्य देशात १९व्या शतकाच्या पुर्वार्धात स्त्रीवादाची सुरवात झाली. पाश्चात्य देशातील स्त्रियांनी आपल्याला राजकीय प्रक्रियेत स्थान मिळावे, मतदानाचा अधिकार मिळावा, शिक्षण—संपत्ती—नोकरी—व्यवसाय यात मानाचे स्थान मिळावे म्हणून प्रयत्न केले. यातूनच इंग्लंड,

अमेरिका, फ्रान्स मध्ये स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला.व्हर्जिनिया वुल्फ यांनी 'अ रूम ऑफ वन्स ओन' या ग्रंथाच्या आधारे स्त्री—स्वातंत्र्याचा विचार मांडला. सिमॉन द बोव्हा यांनी 'द सेकंड सेक्स' या ग्रंथात पुरूष प्रधानता, स्त्रीचे दुय्यमत्व हे विचार उघड केले. केट मिलेट (सेक्सुअल पॉलिटिक्स) यांनी आपआपल्या परीने स्त्रीवादी चळवळीला हातभार लावला आहे.

मराठी स्त्रीवादी साहित्याची वाटचाल

म. फुले यांच्या विचारांनी प्रभावीत झालेल्या ताराबाई शिंदे यांनी इ.स. १८८२ मध्ये 'स्त्री—पुरूष तुलना' अथवा स्त्रीया व पुरूष यांच्यात साहसी कोण? हे स्पष्ट करून दाखविण्यासाठी हा निबंध लिहिला. इ.स. १८५७ मध्ये बाबा पद्मनजी यांनी 'यमुना पर्यटन' कादंबरी लिहून हिंदू धर्मातील विधवांचे दु:ख आपल्या समोर मांडले. अव्वल इंग्रजी काळात साळूबाई तांबवेकर यांची 'स्त्रीप्रभाविरहवर्णन' (१८७३) ही पहिली स्त्री लिखित कादंबरी होय. काशिबाई कानिटकरांची 'रंगराव' (१९०३), जानकीबाई देसाई 'गृहलक्ष्मी' (१९१५), 'प्रेमळ सवत' (१९१७), सौभाग्य तीलक' (१९१८) इ. कादंबऱ्या लिहिल्या.

१९२०ते १९५० या कालखंडात अनेक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.त्यामध्ये यशोदाबाई भट 'मुलांचे बंड'(१९२१),शांताबाई नाशिककर 'हाच का धर्म'(१९३०),कमलाबाई बंबेवाले 'बंधमुक्त'(१९३०),गीता साने 'हिरवळीखाली'(१९२६),विभावरी शिरूरकर यांची 'हिंदोळयावर' (१९३३),प्रेमा कंटक—'काम आणि कामिनी', मालतीबाई दांडेकर 'वज्रलेख', 'काटेरी मार्ग' अशा सुमारे शंभरच्या आसपास कादंबऱ्या या कालखंडात प्रकाशित झाल्या.१९५० नंतर विभावरी शिरूरकर यांची 'बळी' (१९५०),कमल देसाई — 'रात्रंदिन आम्हा' (१९६४), 'काळा सूर्य', 'हॅट घालणारी बाई', ज्योती म्हापसेकर 'मुलगी झाली हो', शकुंतला गोगटे 'जाणता—अजाणता', लीला श्रीवास्तव — 'कितीतरी एवटे' (१९६७),शांता निसळ — 'बेघर' (१९७६),सुमती क्षेत्रमाडे —'महाश्वेता',गौरी देशपांडे —थांग,मुक्काम,उत्खनन, शांता शेळके 'स्वप्नरंजन', शांता गोखले 'रीटा वेलिणकर', आशा बगे —'भूमी'अशा कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

२) हिंदी स्त्रीवादी साहित्याची वाटचाल —

प्राचीन काळात स्त्रीला समाजात पुरूषांच्या बरोबरीचे स्थान होते. कुटुंब, धर्म, समाजामध्ये तिची प्रतिष्ठा होती.उत्तर वैदिक काळानंतर अमुलाग्र बदल झाला. स्त्रीची प्रतिष्ठा उच्च—नीच —अतिनीच अशी ढासळत गेली. स्त्रीने शिक्षण घेणे निषिद्ध मानले गेले. 'शिक्षित कन्या अपने पति के पास नही रहेगी। किसी के साथ भाग जायेगी। कन्या को पढाने से पति की उम्र कम हो जाएगी।'' (डॉ.

श्यामसुंदरदास, साहित्यालोचना, पृ. २८०) अशा गोष्टी समाजात रूढझाल्या.किशोरीलाल गोस्वामी, लत्ताराम शर्मा हे पुनर्विवाह, विधवा—विवाह याला विरोध व सती—प्रथाचे समर्थक होते.

'कादंबरीचा सम्राट' प्रेमचंद यांची 'कर्मभूमी' (१९३२),नागार्जुन 'रतिनाथ की चाची' (१९४८) ,'नई पौध' (१९५३),उदयशंकर भट्ट यांची 'सागर, लहरे और मनुष्य' ,मोहन राकेश 'अँधेरे बंद कमरे' (१९६१),फणीश्वरनाथ रेणु 'दीर्घतपा' (१९६३),शैलेश मटियानी 'चिट्टी रसैन' (१९६३),विवेकी राय 'सोनामाटी' (१९८३),मन्नू भंडारी 'आपका बंटी, एक इंच मुस्कान,'मैत्रेयी पुष्पा'चाक, विजन, इदन्नमम्, अल्मा कबुतरी'. कृष्णा आग्निहोत्री, चित्रा मुद्‌गल, मृणाल पांडे, मालती जोशी, उषा प्रियंवदा इ. लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांमधून स्त्रीवादी साहित्याला बळकटी दिली आहे.

प्रकरण तिसरे

गौरीदेशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या साहित्याचा आढावा व जीवनपरिचय

गौरीदेशपांडे जीवनपरिचय —

यांच्या पोटीगौरी देशपांडे यांचा जन्म १ फेब्रु. १९४२ रोजी पुणे येथे झाला. हे त्यांचे आजोबा आहेत. महर्षी धोंडो केशव कर्वे, दिनकर कर्वे व इरावती कर्वे तीन पिढ्याचा भरभक्कम वारसा त्यांच्या विचार—व्यक्तिमत्वाला लाभला होता.१९७५ ते २००३ या काळातील अगदी अलीकडच्या लेखिका म्हणजे गौरी देशपांडे यांचा उल्लेख केला जाते. त्यांनी मुकस्त्रीला बोलके केले. निर्णय स्वातंत्र्याचा वारसा दिला. या स्वच्छंद आयुष्य जगणाऱ्या लेखिकेचा १ मार्च २००३ रोजी मृत्यु झाला.

गौरी देशपांडे यांचे वाङ्‌मयीन कार्य —

कथासंग्रह—

'आहे हे असं आहे' (१९८६),

कादंबरी—

१.'मध्य लटपटीत' (१९८०), २.'दूरपर्यंत' (१९८५), ३.'निरगाठी' आणि 'चंद्रिके गं. सरिके ग' (१९८७) ४.'दुस्तर हा घाट' (१९८९), ५.'थांग' (१९८९), ६. 'मुक्काम' (१९९२), ७. 'गोफ' (१९९९), ८. 'उत्खनन' (२००२)

ललित गद्य—

विंचुर्णीचे धडे (१९९६)

अनुवाद—

अरेबिअन नाईटस

कवितासंग्रह (इंग्रजी) —

१ण ठमजूममद ठपतजी ;१९६८द्ध २ण स्वेज स्वअम ;१९७०द्ध ३ण ठमलवदक जीम ैसंनहीजमत ीवनेम ;१९७२द्ध

'गौरी देशपांडे यांची एकेक पान गळावया' ही कादंबरी परिवर्तनवादी विचार घेऊन आपल्यासमोर येते. 'मध्य लटपटीत' कादंबरीमध्ये त्यांनी लग्नसंस्थेवर प्रकाश टाकला आहे. अल्पवयीन विवाह, विवाहातील अनावश्यक प्रथा, ढोंग, फसवेगिरी याबद्द्ल नायिका विचारमग्न होते. 'चंद्रिके गं सारिके गं' या कादंबरीमध्ये लग्न, प्रेम, वर्णभेद अशा गोष्टींना उजाळा दिला आहे.

'उत्खनन' या कादंरीची नायिका दुनिया स्वत:च्या गत आयुष्याचे उत्खनन करते. 'थांग' कादंबरीमध्ये पती—पत्नी नात्यातील समस्या, स्त्रीचे लग्नानंतरचे प्रेम, परदेशी जीवनशैली याचे चित्रण येते.'थांग' कादंबरीचा पुढचा भाग 'मुक्काम' मध्ये आहे. थांग मधील कालिंदी अमेरिका सोडून भारतात येते. जीवनाला स्वत:च्या हिमतीवर टक्कर देत नोकरी करते मात्र तिचा एकाकीपणा तीला दिमित्रीकडे घेऊन जातो.

मैत्रेयी पुष्पा यांचा जीवनपरिचय:—

मैत्रेयी पुष्पा यांचे मुळनाव पुष्पा हिरालाल पांडेय आहे. परंतु त्यांच्या जन्मानंतर एका पंडिताने भविष्यवाणी केली की 'ही ज्ञानवान होणार' त्यामुळे आनंदाने त्यांच्या वडिलांनी त्यांचे नाव 'मैत्रेयी' असे ठेवले. मात्र त्यांनी साहित्यिक क्षेत्रात 'मैत्रेयी—पुष्पा' असे नाव धारण केले.स्त्री—पुरूष समानतेबरोबरच लिंग समानतेचा विचार करणाऱ्या या विद्रोही लेखिकेचा जन्म ३ नोव्हेंबर १९४४ मध्ये उत्तर प्रदेश राज्यातील अलीगढ जिल्हयातील सिकुर्रा या गावात एका ब्राम्हण कुटुंबात झाला. लेखिकेचे बालपण संघर्ष, असुरक्षित, अस्थिर असे गेले. गुरूकुल मध्ये मुली शिक्षकांच्या वासनेच्या शिकार होत होत्या हे सर्व लेखिकेने जवळून बघितले होते. मैत्रेयी यांना स्त्री स्वातंत्र्याची किंमत माहिती आहे. मैत्रेयी म्हणतात. ''संयम के बिना आजादी गुलामी से ज्यादा घातक होती है।''

मैत्रेय पुष्पा यांचे वाङ्मयीन कार्य—

कादंबऱ्या

१.स्मृती—दंश (१९९०), २.बेतवा बहती रही (१९९३), ३.इदन्नमम (१९९४) , ४.चाक (१९९७), ५.झूलानट (१९९९), ६.अल्मा कबुतरी (२०००), ७.अगनपाखी (२००१), ८.विजन (२००२), ९.कही इसुरी फाग (२००५), १०.खुली खिडकियॉ (२००८), ११.गुनाह — बेगुनाह

कथासंग्रह—

१.चिन्हार (१९९१), २.ललभनियॉ तथा अन्य कहानियॉ (१९९६), ३.गोमा हॅसती है (१९९८),

आत्मकथा

१. कस्तुरी कुंडल बैसे (२००२), २. गुडियॅा भीतर गुडियॅा

स्त्री साहित्य

१.खुली खिडकियॉ, २.सुनो मालिक सुनो,

नाटक

१.मंदाक्रांता (इदन्नमम वर आधारित), २.सॉग एंड ड्रामा

कवितासंग्रह

बाडे की औरते के लिए

मैत्रेयी पुष्पा यांची इदन्नमम् (१९९४) ही कादंबरी म्हणजे ग्रामीण भागातील आर्थिक शोषण, अंधविश्वास, सांप्रदायिकता, गांधीवाद, मार्क्सवाद यांचे जिवंत उदाहरण आहे. या कादंबरीमध्ये लेखिकेने गावात होणारे स्त्रीचे शोषण, गावातील राजकारणी लोकांची हडपनिती, परंपरा, अवैध शारीरिक संबंध, जातीभेद, नात्यातील ताणतणाव यांचे चित्रण केले आहे. 'चाक' (१९९७) कादंबरीमध्ये लेखिकेने कुमारी माता, प्रतिशोध, विवाहानंतरचे प्रेम प्रकरण, मानसिक संघर्ष, राजकारण, पतीच्या मृत्युनंतर मातृत्व, अशा घटनांचे चित्रण केले आहे. 'अल्मा कबुतरी' (२०००) या कादंबरीमध्ये देहविक्रीय करणारी स्त्री, शिक्षण समस्या, स्वातंत्र्योत्तर काळातील अपराधी जातीचा स्वातंत्र्यानंतर व्यक्तिस्वातंत्र्यासाठी चाललेला संघर्ष चित्रण केला आहे याचे चित्रण केले आहे.

प्रकरण चौथे

गौरीदेशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचे तौलनिक मूल्यमापन

अ) साम्य —

ण्गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबरीतील साम्यस्थळे

१.वाङ्.मयीन—

गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्या स्त्रीवादी या सदरात मोडतात. स्त्रीच्या वाटयाला येणारी दु:खे, स्त्रीची शिक्षण समस्या, लग्न किंवा कटुंबसंस्थेला पर्याय शोधणाऱ्या स्त्रीया, स्त्रियांना

होणारी स्वत्वाची जाणीव, विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्त्रीला पाळाव्या लागणाऱ्या अनेक रूढी—परंपरा अशी अनेक साम्य स्थळे गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये येतात.

२.कुमारी माता —

गौरी देशपांडे यांच्या ‘उत्खनन व मैत्रेयी यांच्या ‘चाक कादंबरीमधील स्त्रीया पुरूषांच्या वासनांध वृत्तीला बळी पडतात. स्त्रीला व्यभिचारातून अपत्य झाले तर तिला शिक्षा दिली जाते. मात्र व्यभिचार करणारा पुरूष उजळ माथ्याने गावभर हिंडत असतो. सगळे दोषोरोपण स्त्रीच्या पदरी पडते याचे वास्तव चित्रण कादंबरीमध्ये येते.

३.शिक्षणाचे महत्त्व —

गौरी देशपांडे व मौत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये शिक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे.उच्च शिक्षण घेण्यासाठी कादंबरीची नायिका प्रस्थापीत व्यवस्थेविरूध्द लढा देते.गावातील मुलांनी माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी गावात शाळा असाव्यात तरच स्त्रीया उच्चशिक्षण घेऊ शकतात याचा विचार आलाआहे.

४.विद्रोही स्त्रीचित्रण —

गौरी देशपांडे वमैत्रेयी यांनी विद्रोही स्त्रीचित्रण केले आहे. पुरूषांचे वर्चस्व नाकारून स्त्रीया बंडखोरी करतात.

ब) भेद

ߜ गौरीदेशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांतील भेद

१. भाषाशैली —

गौरी देशपांडे यांनी स्त्रियांच्या मनातील मानसिक आंदोलने नेमकेपणाने टिपण्यात यश मिळवले आहे. एक रोकडा विचार, असांकेतिक आयुष्य जगण्याऱ्या नायिकांच्या मार्फत मांडण्यात गौरी देशपांडे यांची भाषाशैली परिणामकारक ठरली आहे.मैत्रेयी यांच्या ‘इदन्नमम्’ मध्ये ग्रामीण, अशिक्षित, अडाणी लोकांची भाषा येते तसेच देशाच्या उत्तर भागातील शब्द, संवाद रूढी—परंपरा यांची रेलचेल आहे.

२.उच्च मध्यमवर्गीय स्त्री चित्रण —

गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांमध्ये उच्च मध्यमवर्गीय स्त्रीचित्रण येते. यांच्या कादंबऱ्यांमधील नायिका अमेरिका, जपान सारख्या देशात राहतात. व तेथील विस्तृत अनुभवविश्व घेऊन आपल्या समोर येतात. मात्र मैत्रेयी पुष्पा यांच्या नायिका ग्रामीण भागात राहणाऱ्या ग्रामीण समस्यांना तोंड देत जगणाऱ्या आहेत. तरीही अशा स्त्रीयांच्या समस्या मात्र समान असल्याच्या दिसतात.

३.अंधश्रद्धा —

मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्या ग्रामीण परिघ घेऊन येतात परिणामी ग्रामीण भागातील श्रद्धा—अंधश्रद्धा यांचे चित्रण त्यांच्या इदन्नमम्, चाक सारख्या कादंबऱ्यामधून येते. 'चाक' या कादंबरीमध्ये मैत्रेयी पुष्पा यांनी भूत—प्रेत या समस्येवर प्रकाश टाकला आहे.

४.भारतीय व विदेशी समाजप्रवृत्तींचे दर्शन —

भारतीय स्त्रीचे कुटुंबसंस्थेतील स्थाान, पुरूषमनातील स्त्रीसंबंधीच्या संकल्पना, योनीशुचित्व या पार्श्वभूमीवर पाश्चिमात्य आधुनिक संस्कृतीच्या प्रभावातील स्त्रीजीवनचित्रे गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांमधून प्रकट होतात. त्यामुळे भारतीय संस्कृतीला न रूचणाऱ्या अनुभवविश्वाचे ढळढळीत चित्रण मराठी साहित्यात गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांतून प्रकट होते.

क. गौरी देशपांडे व मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यावरील प्रभव व प्रभाव

प्रभाव हा वाङ्.मयीन, अवाङ्.मयीन संस्कृतीसंकर यापैकी एकाचा किंवा सर्वांचा असू शकतो. सभोवताली घडणाऱ्या अनेक घटनांचा मानव अनुभव घेतो. ज्या वातावरणात साहित्यिक वावरतो त्या वातावरणाशी त्याचे नाते जुळते.समाजातील रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, राजकारण, धर्म, जाती व्यवस्था या सर्वांचा प्रभावगौरी देशपांडे व मैत्रेयी यांच्या जीवनावर पडला आहेयाचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या कादंबऱ्या वाचताना येतो. स्त्री—मुक्ती, विवाहसंस्था, स्त्री—पुरूष नाते, परदेशचित्रण, निसर्गवर्णने, शेती, अंधविश्वास, राजकारण यांची रेलचेल त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये दिसून येते. त्यांच्या कादंबरीतील स्त्री मुक्त व स्वतंत्र आहे. लेखिकेच्या स्वत:च्या आयुष्याचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर पडलेला दिसतो.

प्रकरण पाचवे

निष्कर्ष

गौरी देशपांडे व मौत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांचेतौलनिक साहित्याभ्यासाच्या दृष्टिकोनातून संशोधन केले असता हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणामध्ये नोंदविण्यात येतील.

(सदर आराखड्यामध्ये आणि प्रकरणांच्या विभागणीमध्ये अभ्यासाअंती बदल होण्याची शक्यता आहे)

कादंबरी

१.मैत्रेयी पुष्पा — ''इदन्नमम'' किताबघर प्रकाशन, नई दिल्ली, द्वितीय सं. २००७

२.मैत्रेयी पुष्पा — ''अल्मा कबूतरी'' राजकमल पेपर बैक्स,नयी दिल्ली, प्रथम सं. २००४

३.मैत्रेयी पुष्पा – ‘‘चाक’’ राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, तिसरी आवृत्ती २००९
४.गौरी देशपांडे – ‘तेरूआ’ आणि ‘काही दूरपर्यंत’ ‘मौज प्रकाशन’ ‘मुंबई १९८५’
५.गौरी देशपांडे – ‘निरगाठ’ आणि ‘चंद्रिके गं. सारिके गं’ मौज प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती जून १९८७
६.गौरी देशपांडे – ‘दुस्तर हा घाट’ आणि ‘थांग’, ‘मौज प्रकाशन, मुंबइ’ १९८१

संदर्भ ग्रंथ

१. अग्रवाल जे.सी. – ‘‘भारत में नारी शिक्षा’’विद्या विहार, नई दिल्ली, प्र.सं.२००९
२. संपा:डॉ. सुलक्षणा कुलकर्णी – ‘‘स्त्रीलिखित साहित्याचा अभ्यास’’शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे वार्षिक मुखपत्र, शिविम मराठी संशोधन पत्रिका, वर्ष ३ रे : अंक ३ रा, फेब्रुवारी २०१५
३. संपा. विजया राजाध्यक्ष – ‘‘मराठी कादंबरी : आस्वाद यात्रा’’ पॉप्युलर प्रकाशन, पुणे २००७
४. संपा विलास खोले – ‘‘गेल्या अर्धशतकातील मराठी कांदबरी’’
५. संपा.गं.ना. जोगळेकर – ‘‘मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास, (काही लेखक, काही साहित्यकृती)’’ स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे
६. संपा.मंगला आठलेकर –‘‘महर्षि ते गौरी’ राजहंस प्रकाशन, पुणे १९९९
७. खडपेकर विनया – ‘‘स्त्री स्वातंत्र्यवादिनी’ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९१
८. चौधरी इंद्रनाथ – ‘‘तुलनात्मक साहित्यकी भूमिका’’नैशनल पब्लिकेशन हाऊस, दिल्ली १९८३
९. जहागिरदार चंद्रशेखर – ‘‘तौलनिक साहित्याभ्यासः तत्वे आणि दिशा’’ सौरभ प्रकाशन, कोल्हापूर १९९३
१० थोरात हरीश्चंद्र – ‘‘कादंबरीविषयी’’ पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००६
११ देवधर विद्या –‘‘स्त्रीलिखित कादंबऱ्या : प्रेरणा आणि प्रवृत्ती (इ.स. १८७३ ते १८५०)’’प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९२
१२ देशपांडे कुसमावती – ‘‘मराठी कादंबरी, पहिले शतक (१८५०–१९५०)’’मुंबई मराठी साहित्यसंघ प्रकाशन, मुंबई दुसरी आवृत्ती, १९७५
१३ डॉ. धोंगडे अश्विनी – ‘‘स्त्रीवादी समीक्षाः स्वरूप आणि उपयोजन’’
१४ नगेंद्र – ‘‘तुलनात्मक साहित्य’’ नॅशनल पब्लिकेशन हाऊस दिल्ली,१९८३

१५पाटील आनंद – ‘‘तौलनिक साहित्य : नवेसिद्धांत आणि उपयोजन’’साकेत प्रकाशन, औरंगाबाद १९९८ १६पांडे अनिल कुमार – ‘भारतीय शिक्षा का इतिहास एवं समस्याएँ,’साहित्य रत्नालय, कानपूर, प्र.सं.२०१०

१७बापट वसंत – ‘‘तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्वे आणि दिशा’’मौज प्रकाशन गृह, मुंबई १९८१

१८मंचरकर र.बा. – ‘‘तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय’’ प्रतिमा प्रकाशन, पुणे २००३

१९शेवडे इंदूमती – ‘‘मराठी कथा उगम आणि विकास’’मुंबई,१९७३

२० संपा विनया डोंगरे, विद्या देवधर–स्त्री साहित्याचा मागोवा खंड २

मासिके

१.‘मिळून साऱ्याजणी’, ‘गौरी विशेषांक २००३’, मौजे प्रकाशन पुणे.

२.आठवलेकर मंगला –‘‘स्त्रीवादी कादंबरी’’:ललित (मासिक) कादंबरी विशेषांक मुंबई, दिवाळी नोव्हेंबर २०१३

मार्गदर्शकाची सही **संशोधकाची सही**

(प्रा.डॉ. एम. एम. जाधव.) (कु.जयश्री सुरेश बाबर.)